

पवित्र श्रावण मासाच्या हार्दिक शुभेच्छा!

www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199

Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-४५ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. २८ जुलै २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४

# ‘लाडकी बहीण योजने’वर पुरुषांचा डल्ला?

## १४ हजार पुरुषांनी ‘लाडक्या बहिणींचा’ निधी पळविला

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वसुलीचा इशारा

पुणे (अट्टल मत प्रतिनिधी)

महायुती सरकारच्या लाडकी बहीण योजनेवरून गेल्या काही दिवसांपासून गदारोळ सुरू आहे. कधी निधीचा अभाव, तर कधी योजनेचे निकष यावरून ही योजना राज्याच्या राजकारणात सातत्याने चर्चेत आहे. अशातच राज्यातील १४,२९८ पुरुषांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतल्याची माहिती समोर आली आहे.

गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात सुरू झालेल्या या योजनेवर पुरुषांनी कसा डल्ला मारला, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यावर आता उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी ‘ज्या पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतला आहे, त्यांचे पैसे वसूल करणार असल्याचा’ इशारा दिला आहे.

लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींची छाननी करताना १४,२९८ पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले. सरकारला लाडकी बहीण योजनेवर वर्षाकाठी ४२ हजार कोटी रुपये खर्च करावे लागत आहेत. १४,२९८ पुरुष योजनेचा लाभ घेत होते, असे निदर्शनास आल्यानंतर आता त्यांचे दरमहा १५०० रुपये मानधन बंद करण्यात आले. मात्र त्या आधीच त्यांच्या खात्यांमध्ये या योजनेचे पैसे जमा झाले आहेत. त्यामुळे आता हे पैसे सरकार परत घेणार का? असा प्रश्न विचारला जात होता. यावर अजित पवार यांनी पैसे वसूल करणार असल्याचा इशारा दिला आहे. त्यांना कोणी घुसवले, छाननी कोणी केली आणि महिलांसाठीच्या योजनेवर पुरुषांनी डल्ला मारला कसा, त्यासाठी जबाबदार कोण, असे प्रश्नही आता निर्माण झाले आहेत. सार्वजनिक वितरण प्रणालीत उपलब्ध असलेल्या डेट्याची पडताळणी केली असता, आणखीही गंभीर बाबी समोर आल्या.

**सहकार्य न केल्यास कारवाई –** गरीब महिलांना आर्थिक मदत करण्यासाठी ही योजना सुरू केली आहे. ही योजना पुरुषांसाठी नव्हती, त्यामुळे त्यांच्याकडून आम्ही पैसे वसूल करू. जर त्यांनी सहकार्य केले नाही, तर त्यांच्यावर आम्ही कारवाई करू, असा इशारा अजित पवार यांनी दिला.

**८ लाख कुटुंबांतील २ पेक्षा अधिक महिलांना लाभ–** एका कुटुंबातील दोनपेक्षा अधिक महिलांना योजनेचा लाभ दिला जाणार नाही, असा नियम असताना एकाच कुटुंबात दोनपेक्षा अधिक महिलांनी लाभ घेतल्याची ७ लाख ९७ हजार ७५१ प्रकरणे समोर आली आहेत. अशा प्रकरणांतील महिलांना लाभार्थींच्या यादीतून वगळण्याबाबतचा निर्णय अद्याप झालेला नाही. पण त्यांना आतापर्यंत १,१९६ कोटी ६२ लाख रुपये मिळाले.

**अपात्र लाभार्थ्यांना बाजूला करणार –** ऑगस्ट २०२४ मध्ये सुरू करण्यात आलेल्या या योजनेत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यामध्ये दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येत आहेत. या योजनेमुळे महायुतीला विधानसभा निवडणुकीत मोठा फायदा झाला होता. त्यानंतर सरकारने ही योजना सुरूच राहणार असल्याचे म्हटले. मात्र काही महिलांनी योजनेच्या अटीचे उल्लंघन करून या योजनेचा लाभ घेतला. अनेक ठिकाणी ६५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या, पात्र नसलेल्या महिला देखील या योजनेचा लाभ घेत होत्या. त्यामुळे वर्षभरापासून या योजनेच्या लाभार्थ्यांची छाननी सुरूच आहे. तिजोरीवर ताण पडत असल्याने सरकारने आता अपात्र लाभार्थ्यांना बाजूला करण्याचे काम सुरू केले आहे.

### लाडकी बहीण योजनेसाठी २६ लाख महिला अपात्र



मुंबई: लाडकी बहीण योजना महायुती सरकारसाठी गेमचेंजर ठरली. या योजनेचा लोकांनी गैरफायदा घेत पैसे लाटल्याचे अनेक प्रकार समोर आले. त्यानंतर लाडक्या बहिणींच्या अर्जांची छाननी केली जात आहे. त्यानुसार राज्य सरकारकडून जून महिन्यातील लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांची आणि अपात्र महिलांची संख्या पहिल्यांदाच जाहीर करण्यात आली. जून २०२५ पासून २६.३४ लाख अर्जदारांचा लाभ तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आला.

**बनावट लाभार्थ्यांवर कारवाई?**

शासनाची दिशाभूल करून चुकीच्या पद्धतीने लाभ घेणाऱ्या बनावट लाभार्थ्यांवर काय कारवाई करायची याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत चर्चा करून योग्य निर्णय शासन स्तरावर घेण्यात येईल, अशीही माहिती महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. आदिती तटकरे यांनी एक पोस्ट शेअर करत याबद्दल सविस्तर माहिती दिली. ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत पात्र ठरलेल्या सर्व अर्जांची ओळख पटवण्यासाठी महिला व बालविकास विभागाने शासनाच्या सर्व विभागांकडून माहिती मागवली. यानुसार माहिती व तंत्रज्ञान विभागाने सुमारे २६.३४ लाख लाभार्थी अपात्र असताना देखील लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत असल्याची माहिती सादर केली. यात काही लाभार्थी एकापेक्षा जास्त योजनांचा लाभ घेत असल्याचे, काही कुटुंबामध्ये २ पेक्षा जास्त लाभार्थी असल्याचे, तर काही ठिकाणी पुरुषांनी अर्ज केल्याच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत,’ असे तटकरे यांनी स्पष्ट केले. लाडकी बहीण योजनेची महत्त्वाची अट म्हणजे अर्ज करणारी महिला फक्त लाडकी बहीण योजनेचाच लाभ घेत असावी. दुसऱ्या कोणत्याही सरकारी योजनेचा लाभ घेत असाल तर अर्ज अपात्र ठरेल. अशा विविध कारणांमुळे २६.३४ लाख अर्जदारांचा लाभ तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आला आहे. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून शहानिशा करून त्यापैकी जे लाभार्थी पात्र ठरतील त्यांचा लाभ शासनातर्फे पुन्हा सुरू करण्यात येणार आहे.

## भ्रष्टाचार करणाऱ्या भावांची ईडी आणि सीबीआय चौकशी करण्याची मागणी

लाडकी बहीण योजनेत मोठा घोटाळा झाल्याचं बोललं जात आहे. लाडक्या बहिणींचे पैसे पुरुषांनी लंपास केले आहेत. पुरुषांनी फॉर्म भरुन योजनेचे कोट्यवधी रुपये मिळवल्याचं बोललं जात आहे. यावर आता खासदार सुप्रिया सुळे यांनी ईडी आणि सीबीआय चौकशीची मागणी केली आहे.

हायुती सरकारची अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना असलेल्या लाडकी बहीण योजनेच्या पैशांवर लबाड भावांनी डल्ला मारल्याचं वृत्त समोर आलं आहे. तब्बल १४२९८ पुरुषांनी फॉर्म भरुन लाडकी बहीण योजनेचे पैसे आपल्या खात्यावर मिळवल्याचा धक्कादायक प्रकार घडल्याचं बोललं जात आहे. हा एक मोठा भ्रष्टाचार असल्याचं म्हणत खासदार सुप्रिया सुळे यांनी ईडी किंवा सीबीआय चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली आहे. खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, लाडकी बहीण योजनेचे १४ हजार पुरुषांनी फॉर्म भरलेच कसे? कोणाकडे फॉर्म भरण्याचं कंत्राट आहे त्याची चौकशी व्हायला हवी. ईडी आणि सीबीआय त्यांच्या मागे लागली पाहिजे. एरव्ही छोट्या-छोट्या गोष्टींसाठी विरोधी पक्षांच्या मागे ईडी आणि सीबीआय लावतात. इथे एवढा मोठा भ्रष्टाचार आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले म्हणजे आपल्या संस्कृतीचे, स्वाभिमानाचे प्रतीक!

नवी दिल्ली: छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले म्हणजे आपल्या संस्कृतीचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहेत. युनेस्कोने मराठा साम्राज्याच्या १२ किल्ल्यांना ‘जागतिक वारसा स्थळ‘ म्हणून मान्यता दिली. यापैकी अकरा किल्ले महाराष्ट्रामध्ये आणि एक किल्ला तामिळनाडूमध्ये आहे. किल्ल्याच्या बांधकामासाठी वापरलेला प्रत्येक दगड, प्रत्येक चिरा हा एका ऐतिहासिक घटनेचा साक्षीदार आहे, असा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ’मन की बात’ कार्यक्रमातून दिला.




शिवनेरी, या किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला. काही किल्ले असे आहेत की, त्यांना भेदणे शत्रूलाही शक्य झाले नाही. खांदेरीचा किल्ला तर सागरामध्ये बनविण्यात आलेला अद्भुत किल्ला आहे. हा किल्ला बनविला जावू नये, यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांना शत्रूपक्ष रोखू इच्छित होता, परंतु छत्रपती शिवाजी महाराज यांनी अशक्य ते शक्य करून दाखवले. प्रतापगडच्या किल्ल्यामध्ये अफजल खानाला पराभवाचे पाणी पाजले होते. त्या पराक्रमांच्या गाथांचा जयजयकार या किल्ल्यांच्या भिंती, बुरूजांमध्ये आजही समावला आहे. विजयदुर्ग या किल्ल्यामध्ये गुप्त बोगदे होते. हा किल्ला म्हणजे, छत्रपती शिवाजी महाराज किती दूरदृष्टीचे राज्यकर्ते होते, याचे प्रमाण या किल्ल्यामध्ये सापडते. अनेक किल्ले ठाम पणे उभे आहेत. ते फक्त विटा आणि दगड नाहीत, तर ते आपल्या संस्कृतीचे प्रतीक आहेत. ते संस्कार आणि स्वाभिमान आहेत. मी सर्व देशवासीयांना या किल्ल्यांना भेट देऊन इतिहास जाणून घ्यावा असे आवाहन मोदी यांनी केले. ’मन की बात’च्या १२४ व्या आवृत्तीत पंतप्रधान मोदी यांनी देशवासीयांना संबोधित केले. त्यांनी आपल्या भाषणात म्हटले की, ’मन की बात पुन्हा एकदा देशाच्या यशाबद्दल, देशवासीयांच्या कामगिरीबद्दल बोलेल.अलिकडच्या काळात देशात, क्रीडा, विज्ञान आणि संस्कृतीमध्ये असे बरेच काही घडले आहे ज्याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे. अलिकडच्या काळात, शुभांशू शुक्लाच्या अंतराळातून परतण्याबद्दल बरीच चर्चा झाली. शुभांशू पृथ्वीवर उतरताच संपूर्ण देश आनंद आणि अभिमानाने भरून गेला.’ पंतप्रधान म्हणाले, ‘२१ व्या शतकात भारतात विज्ञान वेगाने प्रगती करत आहे. काही दिवसांपूर्वी, भारताचे देवेश पंकज, संदीप कुची, देबदत्त प्रियदर्शी आणि उज्ज्वल केसरी यांनी आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र ऑलिंपियाडमध्ये पदके जिंकली आणि देशाचे नाव उंचावले. भारत गणिताच्या जगातही आपले स्थान निर्माण करत आहे आणि आमच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय गणितीय ऑलिंपियाडमध्ये तीन सुवर्ण, दोन रौप्य आणि एक कांस्यपदक जिंकले आहे. पुढील महिन्यात, मुंबईत खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र ऑलिंपियाड होणार आहे. हा आतापर्यंतचा सर्वात मोठा ऑलिंपियाड असेल. भारत आता ऑलिंपिक आणि ऑलिंपियाड दोन्हीसाठी पुढे जात आहे.’ जागतिक पोलिस आणि अग्निशमन खेळांमध्ये सुमारे ६०० पदके जिंकल्याबद्दल पंतप्रधानांनी भारताचे कौतुक केले. आम्ही ७१ देशांमध्ये पहिल्या तीन स्थानांवर पोहोचलो आहोत. पंतप्रधान मोदी म्हणाले की देशातील क्रीडा-संबंधित स्टार्टअप्सना सर्व प्रकारची मदत केली जाईल. स्वच्छ भारत मोहिमेचे कौतुक करताना ते म्हणाले की लवकरच या मोहिमेला ११ वर्षे पूर्ण होतील. ते म्हणाले की आता ते एक जनचळवळ बनले आहे. या वर्षी देशातील ४५०० हून अधिक शहरे स्वच्छ सर्वेक्षणात सामील झाली आहेत.

संपादकीय

# सर्पांच्या बाबतीत साक्षरता हवी!

शहरीकरणामुळे आणि मानवाच्या अतिक्रमणामुळे सापांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. मुंबईसारख्या शहरात लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे अन्न व निवाऱ्याची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावू लागली आहे. माणसाच्या निवाऱ्याचा प्रश्न उद्भवू लागल्यामुळे जंगले तोडून काँक्रिटीकरण, मोठमोठ्या इमारती प्राण्यांच्या वस्तीत प्रगत माणूस उभारू लागला आहे. आजकाल आपण नेहमी ऐकतो की वन्यप्राणी मानवी वस्तीमध्ये शिरले आहेत. यामुळे मनुष्य आणि वन्यजीव यांच्यात संघर्ष निर्माण होतो. या संघर्षात दोघांनाही इजा होते. या समस्येवर तोडगा काढणे खूप गरजेचे आहे.

नागपंचमी आली की बाजारात प्लास्टिकचे नाग, मोबाइलवर ऋखक्र सर्प आणि फेसबुक स्टोरीज दिसतात. मात्र साप काही दिसत नाहीत. दुपारच्या वेळी शाळेतून घरी येताना पायवाटांवर सावली देणारी चिंच, वड, पिंपळांची झाडं असायची. कधीकधी शाळेत ये-जा करताना साप दिसायचे. तेव्हा थोडी भीती वाटायची, पण ती भीती 'दुरावा' निर्माण करायची नाही. उलट एक कौतुकाचं, निसर्गाशी जवळीक जपणारं नातं तयार व्हायचं. नागपंचमी आली की आई भिंतीवर नागोबाची रांगोळी काढायची. तांदळाच्या पिठाच्या ठिपक्यांची बोटे उमटवून नागाची आकृतीची रांगोळी पूर्ण व्हायची. मुलं मातीचे नाग घडवायची. कुणाच्या तरी कुंपणात खराखुरा नाग डोकं वर काढून उभा असायचा आणि त्याच्यावर हळद-कुंकू वाहिलं जायचं. तो एक सण नव्हता, तो एक सजीव अनुभव होता.

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी झपाट्याने शहरीकरण होत आहे. जी गावं कधी काळी हिरवाईने नटलेली होती, ती आता रस्ते, टाइल्स, इमारती, गाड्यांनी भरू लागली आहेत. याच गावांमध्ये आधी सापांना निवारा मिळायचा. झाडं, ओलसर माती, ओढे, पाणवठे. हे सगळं गिळंकृत झालं आणि ज्यांना या गोष्टींची गरज होती ते सर्पही हरवू लागले. पूर्वी शेतशिवारात, वस्तीच्या कडेला सहज नाग, धामण, मण्यार, कवड्या, घोणस दिसायचे. पण आता तिथे भली मोठी गृहनिर्माण प्रकल्प, काँक्रीटचे रस्ते आणि भूमिगत केबल्स दिसतात. सर्पांचे घरच नाहीसे झाले आहे.

साप म्हणजे नुसता 'पूजनीय प्राणी' नव्हे, तर तो एक अत्यंत महत्त्वाचा परिसंस्था संतुलक आहे. साप उंदीर, बेडूक, सरडे, कीटक खातो - त्यामुळे शेतीचं नुकसान टळतं, रोगराई आटोक्यात राहते. आज जर साप नसतील, तर उद्या उंदीर शेतं पोखरतील. म्हणून सापांची उपस्थिती ही शत्रू नव्हे, मित्र म्हणूनच बघायला हवी होती. मात्र आपण काय केलं? त्यांची घरं उद्ध्वस्त केली आहेत. नागपंचमीच्या सणाला आपण बाजारातून नागाच्या मूर्ती खरेदी करून त्याची पूजा करतो. एकेकाळी नागपंचमी म्हणजे निसर्गाशी, सर्पांशी थेट भेट होणारा दिवस होता. महिला वारुळाच्या ठिकाणी जाऊन वारुळ, नागाची पूजा करायच्या. आज तो एक 'पोस्ट अपलोड' करण्याचा दिवस झाला आहे. नागपंचमीची मूळ भावना हरवली असून उरली ती केवळ कृत्रिमता. एवढंच नाही तर अनेकदा नागपंचमीसाठी खरे साप 'पकडून' आणले जातात, पिंजऱ्यांमध्ये ठेवले जातात. त्यांना दारू, दूध पाजून त्यांच्या जीवाशी खेळलं जातं. 'साप' दिसला की त्याला मारून टाकण्याचे प्रकार वाढत आहेत. फक्त सर्पांची पूजा नको, त्यांच्या अधिवासाचं संरक्षण करायला हवं. प्रत्येक शहरात हरित पट्टयांची संख्या वाढवली पाहिजे. शाळा-महाविद्यालयांत 'सर्पसाक्षरता अभियान' राबवले पाहिजे. सर्पमित्र संघटनांना मदत करणे, नागपंचमीच्या निमित्ताने पर्यावरण दिन पाळणे, सोशल मीडियावर फोटो टाकण्याऐवजी - झाड लावा, झुडप जपा असा अट्टहास, प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे. आपण त्यांचे अस्तित्व उद्ध्वस्त न करता, त्यांच्या अन्नसाखळीवर घाला न घालता वाढते शहरीकरण, जंगलतोड कशी रोखता येईल याचा विचार केला पाहिजे.

सर्पांची घटती संख्या - एक पर्यावरणीय अलार्म

पूर्वी पावसाळ्याच्या दिवसात एक सर्प मित्र सुमारे १५० ते २०० साप पकडून सुरक्षित ठिकाणी सोडत होते. मात्र आता परिस्थित उलटी आहे. जिथे खऱ्या जंगलाची जागा सिमेंट क्राँक्रीटच्या जंगलांनी व्यापली आहे, अशा ठिकाणी वर्षभरात नाग दिसणंही कठीण झालंय. शहराच्या विस्तारात ङ्गसाप कुठे राहणार?ङ्घ हा प्रश्नच कुणी विचारत नाही. शहरात उरलेल्या गवताळ जागा, ओढे, डबकी यांवरही अतिक्रमणं. त्यामुळे सापांच्या अन्नसाखळीचाही बळी जातोय. सर्प नष्ट झाले, म्हणजे निसर्गाचा एक महत्त्वाचा भाग गमावला.

# भारत आणि जागतिक अर्थव्यवस्था: अनिश्चिततेतून स्थैर्याकडे वाटचाल

जगाच्या सध्याच्या आर्थिक स्थितीकडे पाहिल्यास ती एकाच वेळी गुंतागुंतीची, अनिश्चिततेने भरलेली आणि वेगवेगळ्या दिशांनी ताणलेली वाटते. २०२५ सालच्या सुरुवातीला जागतिक अर्थव्यवस्था पुन्हा स्थिर होईल अशी अपेक्षा होती, परंतु विविध देशांत सुरू असलेल्या महागाईच्या लाटा, व्यापारातील तणाव, राजकीय अस्थिरता आणि व्याजदरांतील बदल यामुळे जागतिक आर्थिक स्थिती फारशी मजबूत वाटत नाही. कोरोनानंतर काही देशांनी झपाट्याने सुधारणा केली असली, तरी अनेक विकसनशील आणि काही विकसित अर्थव्यवस्थाही अजून पूर्णतः सावरलेल्या नाहीत.

२०२५ मध्ये जागतिक आर्थिक वाढीचा दर सरासरी २.९ ते ३.३ टक्क्यांच्या दरम्यान राहील असा अंदाज खचत्र, जएउ आणि जागतिक बँकेने वर्तवला आहे. पण हा दर कोविडपूर्व काळातील ४ ते ५ टक्क्यांपर्यंतच्या वाढीच्या तुलनेत कमी आहे. याचा अर्थ असा की जगातील एकूण उद्योगधंदा, सेवा, उत्पादन, व्यापार आणि गुंतवणूक या सर्व गोष्टींचा वेग सध्या मंदावलेला आहे. काही देशांत थोडाफार उत्साह दिसतो, पण तोही तात्पुरता आहे. मोठ्या प्रमाणावर स्थिर आणि व्यापक प्रगती दिसत नाही.

महागाई ही सध्या जगभरातील सर्वसामान्य माणसाच्या खिशाला मारणारी सर्वात मोठी समस्या बनली आहे. अनेक देशांमध्ये अन्नधान्य, इंधन, घरभाडे, औषधे आणि शिक्षणाच्या किमती प्रचंड वाढल्या आहेत. विशेषतः युरोप, अमेरिका आणि दक्षिण अमेरिकेतील देश महागाईशी झगडत आहेत. महागाई नियंत्रणात आणण्यासाठी बऱ्याच देशांच्या मध्यवर्ती बँकांनी व्याजदर वाढवले आहेत. उदा. अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा या देशांनी अलिकडच्या काळात व्याजदर वाढवून कर्ज घेणं महाग केलं आहे. यामुळे घर घेणं, गाडी घेणं, उद्योगांसाठी भांडवल उभारणं हे सगळं महाग आणि कठीण झालं आहे.

जगातील व्यापाराची स्थितीही काहीशी तणावपूर्ण आहे. अमेरिका आणि चीन यांच्यातील व्यापारयुद्ध अजूनही थांबलेलं नाही. विविध वस्तूंवर लावलेले टॅरिफ, म्हणजेच आयातीवरील कर, यामुळे उत्पादन खर्च वाढतो आणि महागाईला उधाण येतं. याचवेळी अमेरिका आणि युरोपियन संघटना रशियावर विविध प्रकारचे निर्बंध लावत आहेत, जे उर्जा आणि धातूंच्या किमतींवर प्रभाव टाकत आहेत. भारत, ब्राझील, इंडोनेशिया यांसारखे देश सध्या 'न थांबता सर्वांशी व्यापार करा' या नीतीने स्वतःचं स्थान मजबूत करत आहेत. पण जागतिक व्यापारासाठी उघडं आणि स्थिर वातावरण तयार होईपर्यंत ही अस्थिरता कायम राहण्याची शक्यता आहे.

युक्रेन आणि रशिया यांच्यात चाललेलं युद्ध हे जागतिक स्थैर्याच्या दृष्टीने मोठं आव्हान आहे. याचा परिणाम अन्नधान्य, तेलबियांची आयात, नैसर्गिक वायूचा पुरवठा, आणि संपूर्ण युरोपमधील उर्जावहन यावर झाला आहे. युद्धाचे थेट परिणाम फक्त युरोपपुरते मर्यादित नसून ते आफ्रिका आणि आशियातल्या अनेक गरीब देशांवरही पडले आहेत. अशा वेळी निधीची मदत, कर्जमाफी, आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याची गरज मोठ्या प्रमाणात भासते. पण युरोप आणि अमेरिका आपापल्या अंतर्गत समस्यांमध्ये अडकले असल्याने जागतिक स्तरावर सहकार्य फारसं सक्रिय दिसत नाही.

दुसऱ्या बाजूला, जगातील अनेक देश त्यांच्या परकीय गंगाजळीत घट होत असल्याने आर्थिक निर्णय घेण्यात सावध झाले आहेत. डॉलरवर अवलंबून असलेली जागतिक चलनव्यवस्था सध्या दबावाखाली आहे. चीन, सौदी अरेबिया, रशिया आणि इतर काही देश डॉलरशिवाय व्यवहार करण्याच्या हालचाली करत आहेत. अशा वेळी सोनं, युरो, रेनमिन्बी आणि डिजिटल चलनांचा पर्याय म्हणून विचार सुरू आहे. क्रिप्टोकरन्सीच्या संदर्भात मात्र अजूनही अनिश्चितता आणि नियंत्रक नियमांमध्ये एकमत नाही.

गुंतवणुकीच्या क्षेत्रात सुद्धा मोठा बदल दिसतो. पूर्वीचा पारंपरिक ६०/४० पोर्टफोलिओ - म्हणजे ६० टक्के इक्विटी (शेअर्स) आणि ४० टक्के बाँड्स - हा आता अपुरा मानला जातो. त्याऐवजी अनेक गुंतवणूकदार प्रायव्हेट इक्विटी, व्हेन्चर कॅपिटल, ग्रीन इन्व्हेस्टमेंट्स, आणि अख संबंधित स्टार्टअप्समध्ये पैसा गुंतवत आहेत. मात्र या गुंतवणुकींमध्ये जोखीम जास्त असल्याने सर्वसामान्य गुंतवणूकदार अजूनही गोंधळात आहेत.

जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांकडे पाहिल्यास, अमेरिका अजूनही सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे, पण तिच्या अर्थव्यवस्थेवर देशांतर्गत राजकारण, निवडणुका, व्याजदर, महागाई आणि व्यापार तणाव यांचा ताण आहे. चीनने मागील पाच वर्षांत चांगली आर्थिक प्रगती केली आहे, मात्र आतील बेरोजगारी, बांधकाम क्षेत्रातील मंदी आणि लोकसंख्येतील घट या समस्या गंभीर आहेत. युरोप सध्या उर्जेवर आणि स्थलांतरितांच्या समस्येवर संघर्ष करत आहे. जपानमध्ये वृद्ध लोकसंख्या आणि उत्पादकतेचा अभाव हे मोठं आव्हान आहे.

भारताची स्थिती तुलनेने थोडी चांगली आहे. जागतिक मंदीच्या पार्श्वभूमीवर भारताचा ऋउझ वाढ दर ६% पेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे. पण देशांतर्गत महागाई, बेरोजगारी, ग्रामीण क्षेत्रातील मंदी, आणि खाजगी गुंतवणुकीचा अभाव यामुळे ही वाढ पुरेशी वाटत नाही. भारताने पायाभूत सुविधा, डिजिटल अर्थव्यवस्था, स्टार्टअप्स, निर्यात आणि ऊर्जा क्षेत्रात पुढाकार घेतला आहे, पण या धोरणांचा परिणाम दिसण्यासाठी वेळ लागेल.

एकंदरीत पाहता, जागतिक अर्थव्यवस्था सध्या सावध वाटचाल या स्थितीत आहे. मंदी नाही, पण भरभराटही नाही. देशांमध्ये महागाई नियंत्रित करतानाच आर्थिक वाढीचं साधन शोधायचं मोठं आव्हान आहे. विकसित देशांनी त्यांच्या धोरणांमध्ये स्पष्टता आणणं, विकसनशील देशांनी गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण तयार करणं, आणि सर्व देशांनी व्यापारात पारदर्शकता आणि सहकार्य वाढवणं हीच सध्याची गरज आहे. अशा स्थितीत भारतासारख्या देशांनी स्वतःच्या गरजेनुसार विकासाचा मार्ग ठरवून, जागतिक अस्थिरतेला संधीमध्ये रूपांतरित करण्याचं सामर्थ्य दाखवणं अत्यंत महत्त्वाचं ठरेल. जागतिक अर्थव्यवस्थेतील ही अस्थिर शांतता, ही एक प्रकारची संधीच आहे - ज्या देशांनी वेळेत योजना आखल्या आणि धोरणे पक्की केली, तेच देश पुढील दशकात जागतिक नेतृत्वाच्या दिशेने वाटचाल करतील.

**- डॉ. भारत कऱ्हाड**
(अर्थविषयक संशोधक, प्राध्यापक व धोरण विश्लेषक)

# श्रावण महिन्यातील विशेष पूजा व उपासना

श्रावण सोमवार व्रत- या महिन्यातील प्रत्येक सोमवार शिवपूजेचा खास दिवस असतो. श्रद्धेने उपवास करत शिवलिंगावर जलाभिषेक, दूध, मध, बिल्वपत्र, धतूरा, फुले अर्पण केली जातात.

**रुद्राभिषेक -** खास पूजा ज्यामध्ये 'ॐ नमः शिवाय' मंत्राचा जप करत शिवलिंगावर विविध द्रव्यांनी अभिषेक केला जातो.

शिव मंत्र- 'ॐ नमः शिवाय'
'महामृत्युंजय मंत्र'
**ॐ त्र्यम्बकं यजामहे
सुगन्धिं पुष्टिवर्धनम्।
उर्वारुकमिव बन्धनान
मृत्योर्मुक्षीय माऽमृतात**

**श्रावणमधील खास गोष्टी :** कांवड यात्रा: काही भक्त पवित्र नद्यांमधून पाणी आणून ते मंदिरातील शिवलिंगावर अर्पण करतात.

**नैवेद्य:** बेलपान, दही, गूळ, दूध यांचा नैवेद्य दिला जातो.

श्रद्धा आणि संयमाचे प्रतीक: या महिन्यात मांसाहार, मद्यपान, कांदा-लसूण यांचे सेवन टाळले जाते.



**श्रावण सोमवार व्रत कथा -** प्राचीन काळी एक गरीब ब्राह्मण आपल्या पत्नीसह एका गावात राहत होता. त्यांचं आयुष्य अत्यंत गरिबीत आणि दुःखात चाललं होतं. त्या ब्राह्मण दाम्पत्याला संतान नव्हतं, आणि त्यासाठी त्यांनी अनेक देवतांची पूजा केली, पण काहीही उपयोग झाला नाही. एक दिवस ब्राह्मण जंगलात गेला असता त्याला एका साधूने विचारले, 'तू इतका दुःखी का दिसतोस?' ब्राह्मणाने उत्तर दिलं, 'माझं आयुष्य गरिबीत जातंय आणि मला मूलसुद्धा नाही.' त्यावर साधू म्हणाला: 'तू श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवार उपवास ठेव.

भक्तीभावाने भगवान शिवाची पूजा कर. सोमवारी बिल्वपत्र, दूध, जल शिवलिंगावर अर्पण कर. सोमवार व्रताचे नियम पाळ आणि व्रताची कथा ऐक.'

ब्राह्मण घरी परत आला आणि आपल्या पत्नीसह सोमवारी उपवास करू लागला. त्याने नियमपूर्वक १६ सोमवार उपवास (सोमवार व्रत) केले. काही दिवसांतच त्यांच्या जीवनात आश्चर्यकारक बदल घडू लागले. थोड्याच काळात: त्यांच्या घरी धनधान्य यायला लागलं. त्यांचा व्यवसाय चांगला चालू लागला. आणि काही महिन्यांत त्यांना सोनसाखळीसारखं एक सुंदर बाळ प्राप्त झालं. ते दोघंही आनंदाने देवाचे आभार मानू लागले. त्यांना समजलं की भगवान शिव आपल्या भक्तांची कधीच उपेक्षा करत नाही.

**व्रत केल्याचे फायदे:** सुख, समृद्धी, संतानप्राप्ती, मानसिक शांती, पापांचे क्षालन, मोक्षप्राप्तीची दिशा- व्रत करताना स्मरणीय गोष्टी: सकाळी लवकर उठून स्नान करावे. 'ॐ नमः शिवाय' जप करत शिवलिंगावर जल व दूध अर्पण करावे. उपवास करणं आणि व्रतकथा ऐकणं आवश्यक आहे. संध्याकाळी पूजा करून व्रत पूर्ण करावं.

# कार्यकर्ता हाच चळवळीचा कणा आहे- गायकवाड!



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

कार्यकर्त्यां हा भाकरीसाठी नाही तर सन्माना करिता जगतो तो सह इच्छा ने समाजाचे दुःख झेलतो कारण तो हिंमत आणि त्याग करण्याची तयारी करतो म्हणून त्याला भाकरीची नाही सन्मानाची गरज आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक नेते चरणदास गायकवाड यांनी केले ते आज कास्टाईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या कार्यालयात आंरिमो चे संस्थापक सदस्य शालिक बांगर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सत्कार कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते या प्रसंगी आंरिमो चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी बांगर यांच्या कार्यावर प्रकाश टाकला बाबुजी सोनटक्के, नामदेवराव निकोसे, मनोहर इंगोले, धर्मा बागडे,राजु दादा पांजरे यांनी अभिषेक मिश्रा यांनी शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजु दादा पांजरे यांनी केले तर आभार प्रदर्शन मामासाहेब मेश्राम यांनी केले या प्रसंगी मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते उपस्थित होते.

# ५० खाटांखालील रुग्णालयांना सूट द्यावी, मनपाचा कर मागे घ्यावा चर्चा

## 'आय.एम.ए.'ची मागणी डॉ. भागवत कराड यांच्याशी शिष्टमंडळाची सखोल

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

इंडियन मेडिकल असोसिएशन छत्रपती संभाजीनगर शाखेच्या वतीने अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने मा. राज्यसभा खासदार व माजी केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड सरांच्या कार्यालयात भेट दिली. यावेळी आरोग्यसेवेच्या संदर्भातील विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल व सकारात्मक चर्चा झाली.



या चर्चेत खालील महत्त्वाचे मुद्दे मांडण्यात आले:

महापालिकेचे अन्यायकारक नोंदणी व नुतनीकरण शुल्क: महानगरपालिकेने खाजगी रुग्णालये व क्लिनिक यांच्यावर रू. ५००० नोंदणी व रू.२५०० नूतनीकरण शुल्क आकारण्यास सुरुवात केली आहे.

IMA ने स्पष्टपणे सांगितले की सर्व वैद्यकीय संस्था आधीच Bombay Nursing Home Act अंतर्गत नोंदणीकृत असून, त्या दरवर्षी रू५००० ते रू३०,००० इतके शुल्क भरतात. त्यामुळे हे नवीन शुल्क म्हणजे दुहेरी कर असून पूर्णतः अन्यायकारक आहे.

मा. डॉ. कराड सरांनी या शुल्काबाबत सकारात्मक भूमिका घेत स्पष्ट आश्वासन दिले की ते लवकरच महापालिकेला यासंदर्भात योग्य त्या सूचना देतील. ५० खाटांखालील रुग्णालयांना जाचक नियमांपासून मुक्तता: अशा लहान रुग्णालयांना इेलरू छीींळपस कोश अलीं मधून सूट मिळावी, जेणेकरून त्यांना नियमांची अडचण न होता सहज व योग्य प्रकारे वैद्यकीय सेवा देता येईल, अशी IMA ची विनंती होती.

डॉक्टरांवरील हल्ल्यांविरोधात प्रभावी उपाय व कायदा : अनेक ठिकाणी डॉक्टरांवर होणारे हल्ले ही गंभीर बाब आहे. याविरोधात केंद्र सरकारने कठोर कायदा बनवावा व त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी केली.

या सर्व मागण्यांवर सखोल चर्चा केल्यानंतर माननीय डॉ. कराड यांनी आश्वासन दिले की,

'या सगळ्या मुद्द्यांबाबत मी स्वतः लक्ष घालीन. डॉक्टरांवरील हिंसाचार थांबावा व ५० खाटांखालील रुग्णालयांबाबत नियम शिथिल व्हावेत, यासाठी मी प्रयत्न करेन.

यासाठी IMA छत्रपती संभाजीनगर शाखा, IMA चे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय आरोग्यमंत्री मा. जे.पी. नड्डा यांच्यासोबत संयुक्त बैठक आयोजित करण्यात येईल, असे मा. डॉ. कराड सरांनी स्पष्ट सांगितले.

या शिष्टमंडळात खालील मान्यवर डॉक्टर सहभागी होते:

डॉ. उज्वला दहिफळे, डॉ. योगेश लक्कास, डॉ. संभाजी चिंतले, डॉ. प्रशांत दरक, डॉ. प्रदीप बेजर्गे, डॉ. अर्चना भांडेकर, डॉ. सोनाली सावजी, डॉ बाबासाहेब उनवणे. या भेटीद्वारे प्रशासन व वैद्यकीय क्षेत्र यामधील समन्वय अधिक दृढ होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. IMA छत्रपती संभाजीनगर शाखा नेहमीच डॉक्टरांच्या हक्क, सुरक्षितता व व्यावसायिक सन्मानासाठी सजग राहील, असे अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर व सचिव डॉ. योगेश लक्कास यांनी सांगितले.

# जोगेश्वरी येथील शतकुंडात तरुणाचा मृत्यु



**खुलताबाद**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील जगप्रसिद्ध वेरुळ लेणी वरील भागातून वाहणाऱ्या जलप्रवाह वरील जोगेश्वरी मंदिरासमोरील शतकुंडात पोहण्यासाठी गेलेल्या हर्षदीप नाथ तांगडे वय २२ वर्ष या तरुणाचा बुडुन मृत्यू झाला. औरंगाबाद हुन काही मित्र एकत्रित वेरुळ परिसरात आज फिरण्यासाठी आले होते.या परिसरात फिरल्यानंतर ते सर्वजण वेरुळ लेण्यांच्या वरील बाजूस असलेल्या डोंगरात गेले.

हा डोंगर अतिशय धोकादायक असून या परिसरात म्हैसमाळ येथून मोठ्या वेगाने येळगंगा नदीचे पाणी वाहते या ठिकाणी असलेल्या जोगेश्वरी मंदिरासमोरील मोठ्या कुंडात हे सर्व मित्र पोहोण्यासाठी उतरले परंतु पाण्याचा अंदाज न आल्याने हर्षदीप नाथ तांगडे ( वय २२ वर्ष ) राहणार उस्मानपुरा औरंगाबाद हा पाण्यात बुडू लागला. त्याच्या मित्रांनी मदतीसाठी आरडा ओरडा त्यांचा आवाज ऐकून परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळावर पोचले होते मात्र तोपर्यंत हर्षदीप पाण्यामध्ये बुडाला होता.

या घटनाची माहिती वेरूळ लेणी येथे एका सुरक्षारक्षकांनी वेरूळ लेणी परिसरात तैनात असलेले पोलीस कर्मचारी प्रमोद साळवे. बीड जमादार राकेश आव्हाड यांनी कुंडाकडे स्थानिक तरुणांनी त्याचा कुंडामध्ये शोध घेतला मात्र तो मिळून न आल्याने अग्निशमन दलाला पाचरण करण्यात आले. अग्निशमन दलाच्या जवानांनी मोठे प्रयत्न करत हर्षदीप यास बाहेर काढले व तातडीने वेरूळ प्राथमिक आरोग्य केंद्र हलवले त्या ठिकाणी यांनी त्यास तपासून मृत घोषित केले सामाजिक कार्यकर्ते मसीउद्दीन सौदागर यांचे खाजगी रुग्णवाहिकातून प्राथमिक आरोग्य केंद्र वेरूळ आणले होते

वेरूळ लेणी वरील सतकुंडा परिसर अतिशय धोकादायक असून या ठिकाणी मोठमोठी खोल पाण्याची कुंडे आहेत या कुंडातील पाण्याचा अंदाज नवीन व्यक्तीला येत नाही.

त्यामुळे या ठिकाणी अनेकांना आपला जीव गमवावा लागतो वेरूळ लेणी वरील सुरक्षारक्षक याठिकाणी जाण्यापासून नागरिकांना थांबवितात मात्र उत्साही तरुण सूचनांचे पालन न करता या धोकादायक परिसरात जातात व आपला जीव गमावतात यामध्ये हर्षदीप ला आपला जीव गमवावा लागला नागरिकांनी या धोकादायक परिसरात जाऊ नये असे अवाहन पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी केले आहे.

# विशेष शिक्षकांच्या प्रशिक्षणार्थ सीआरई कार्यक्रमाचा समारोप




**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

दिनांक २४/०७/२०२५, वार – गुरुवार रोजी सुंदरदेवी अपंग शिक्षण व प्रशिक्षण प्रसारक मंडळ छ . संभाजीनगर संचलित स्व . खंडू पाटील निवासी मतिमंद विद्यालय दोंडाईचा जिल्हा धुळे येथे ,माननीय संस्थापक अध्यक्ष श्री शिवाजीराव साळुंके पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सीआरई कॉर्डिनेटर श्री सुरेश राठोड सर यांच्या सहकार्याने दि .२२/०७/२०२५ ते दि .२४/०७/२०२५ तीन दिवसीय विशेष शिक्षकांच्या प्रशिक्षणार्थ सीआरई कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. ह्या कार्यक्रमाचे co-ordinator विशेष शिक्षक श्री कमलेश पाटील सर हे होते.

कार्यक्रमाचा तिसरा दिवस आणि समारोपाचा दिवस होता. कार्यक्रमाच्या समारोपासाठी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री शिवाजीराव साळुंके पाटील साहेब व संस्थेचे संचालक मा. श्री. शुभमदादा शिवाजीराव साळुंके पाटील सर, R.C.I Co-ordinator मा .श्री सुरेश राठोड सर (मुंबई), महाराष्ट्र एनजीओ समितीच्या राज्य संपर्कप्रमुख मा . सौ पूजा ताई खडसे मॅडम , मुख्याध्यापिका श्रीमती मंदा इंगळे मॅडम, विशेष शिक्षिका श्रीमती मनिषा घुगे मॅडम, CRE Co-ordinator विशेष शिक्षक श्री कमलेश निकम सर व उठए साठी आलेले मुख्याध्यापक यांची उपस्थिती लाभली.सर्वप्रथम सर्व मान्यवरांचे शब्दसुमनांनी टाळ्या वाजवून स्वागत केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री शिवाजीराव साळुंके पाटील साहेब यांनी स्वीकारले .कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय श्री शिवाजीराव साळुंके पाटीलसाहेब आणि प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले नंतर सर्व मान्यवरांचा पुष्पगुच्छ , शाल देऊन सत्कार करण्यात आला .प्रमुख पाहुणे म्हणून आलेल्या माननीय सौ पूजा ताई खडसे मॅडम यांनी विविध सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांना एनजीओं मार्फत व सरकारकडून मिळणाऱ्या विविध फंड आणि सहकार्य याविषयी विस्तृत माहिती दिली . संस्थेचे संचालक माननीय श्री शुभम दादा साळुंके पाटील साहेब यांनी आलेल्या प्रशिक्षणार्थींना CRE कार्यक्रमाबद्दल मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या .इतर प्रमुख पाहुण्यांनी कार्यक्रमाबद्दल आणि शाळेच्या नियोजनाबद्दल कौतुक करून मनोगत व्यक्त केले.तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय संस्थाअध्यक्ष साहेबांनी अध्यक्षीय भाषणामध्ये उठए प्रशिक्षणासाठी तीन दिवसापासून संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या सर्व प्रशिक्षणार्थींनी चांगल्या प्रकारे सहकार्य करून प्रशिक्षणाचा लाभ घेतल्याबद्दल आणि प्रशिक्षण देण्यासाठी आलेल्या (resource person ) शिक्षकांनी चांगल्या प्रकारे विशेष शिक्षणाबद्दल अत्यावश्यक माहिती दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले .आणि संपूर्ण महाराष्ट्रातून उठए प्रशिक्षणासाठी आलेल्या सर्व विशेष शिक्षकांना माननीय अध्यक्ष साहेब आणि प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सर्टिफिकेट देऊन शुभेच्छा दिल्या .आजचा प्रशिक्षणाचा तिसरा दिवस एकूण २०० शिक्षकांनी चांगल्या प्रकारे प्रशिक्षण घेऊन पार पडला . त्यानंतर सर्व उठए प्रशिक्षणार्थींना मा . अध्यक्ष श्री शिवाजीराव साळुंके पाटील साहेब संस्थेचे संचालक मा. श्री. शुभमदादा साळुंके पाटील साहेब माननीय सौ पूजा ताई खडसे मॅडम, मुख्याध्यापिका श्रीमती मंदा इंगळे मॅडम आणि आलेल्या इतर मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमांचे सुत्र संचालन सायकॉलॉजिस्ट किशोर शेलार सर आणि रमेश पाटील सर यांनी केले .कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विशेष शिक्षिका श्रीमती मनीषा घुगे मॅडम यांनी केले . कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले व कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.

## महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त गोसेवा हरित सेवा उपक्रम-२०२५ वृक्षारोपन




**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

महा एनजिओ फेडरेशन व सुभद्राबाई शिक्षण प्रसारक मंडळ,छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने गौशाळा मध्ये वृक्षलागवड करून गोसेवा हरित सेवा उपक्रम साजरा करण्यात आला. गोसेवा हरित सेवा मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसाचा आणि शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिवसाचा विशेष उपक्रम गोसेवा हरित सेवा उपक्रम- २०२५

श्री.वर्धमान श्वेतांबर स्थानकवाशी जैन श्रावक संघ अंतर्गत श्री स्थानकवाशी महावीर जैन गौशाळा, चिकलठाणा, प. पु.आसाराम जी बापूजी आश्रमात, गोशाळा बेगमपुरा, श्री गुरु गणेश स्थानक वाशी जैन शिक्षण समिती, गुरु गणेश नगर पहाडसिंगपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे वृक्षारोपन करण्यात करण्यात आले. सुभद्राबाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रामदास गायकवाड, उत्कर्ष संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर हनवते, राजू भालेराव, जॉन आव्हाड, सुभाष पाचुंदे, रामदास नाडे, ज्ञानेश्वर निकम पाटील, सनी भालेराव, सोनी गौतम, दिलीप मुगदिया व कर्मचारी उपस्थित होते तसेच गौशाळेचे सेवक कर्मचारी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळामध्ये सहभाग आवश्यक - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

## शालेय क्रीडा स्पर्धा २०२५- २६ मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ महत्त्वाचे आहेत. शालेय शिक्षणासोबत खेळामध्ये प्राविण्य मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी खेळात सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले. जिल्हाधिकारी कार्यालयात क्रीडा विभागाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली.

जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई, तालुका क्रीडा अधिकारी सोयगाव मुकूंद वाडकर, जिल्हा क्रीडा परिषद सदस्य श्रीमती सुजाता गुल्हाणे, डॉ. रेखा परदेशी, खंडू यादवराव, राम मायंदे आणि क्रीडा मार्गदर्शक श्रीमती पुनम नवगिरे,पोलीस निरीक्षक एस.एस. देशमुख, डी.टी. शिरसाट, विस्तार अधिकारी, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी डॉ. उदय डोंगरे, जिल्हा सॉफ्टबॉल संघटना सचिव गोकुळ तांदळे, प्रपित मोघे बँक ऑफ महाराष्ट्र, लिड बँक श्रीमती शिल्पा मोरे, तुषार आहेर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी निर्देश दिले की, ऑगस्ट महिन्यात जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत एक तासाचे व्याख्यान आयोजित करून खेळ आणि खेळाचे महत्त्व पटवून द्यावे. खेळाडूंना दिल्या जाणाऱ्या सुविधा आणि योजना प्रत्येक खेळाडूपर्यंत पोहोचवावे. तालुकास्तर आणि जिल्हास्तरावर होणाऱ्या सर्व स्पर्धांमध्ये शाळांनी सहभागी होणे अनिवार्य करावे. यासंदर्भात सर्व प्राचार्य आणि मुख्याध्यापक यांना पत्र देण्याचे निर्देश देण्यात आले. विद्यार्थ्यांचा क्रीडा सहभाग वाढेल. म ुलामध्ये विविध प्रकारच्या खेळातील प्राविण्य वाढीस लागून राज्यस्तर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी शिक्षण व क्रीडा विभागाने काम करावे, असेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले. जिल्हाधिकारी तथा जिल्हा क्रीडा परिषदेचे अध्यक्ष दिलीप स्वामी यांच्या हस्ते शालेय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. या म ार्गदर्शक पुस्तिकेमुळे आगामी शालेय क्रीडा स्पर्धांचे नियोजन आणि अंमलबजावणी सुलभ होण्यास मदत होईल, असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला.

# महाराष्ट्राच्या मनात काय हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही दिसेल - मुख्यमंत्री

नागपूर : उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी राज ठाकरे गेले ही आनंदाची बाब आहे. यात राजकीय का पाहता? आमच्याही उद्धव ठाकरे यांना शुभेच्छा आहेत. वाढदिवसाच्या दिवशी शुभेच्छा द्यायला जाणं, यात राजकारण पाहणं योग्य नाही, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते नागपुरात माध्यमांशी बोलत होते. महाराष्ट्राच्या मनात काय आहे, हे तुम्हाला विधानसभेच्या निवडणुकीत दिसलं आहे आणि महाराष्ट्राच्या मनात काय आहे, हे तुम्हाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही दिसेल. मात्र काही पक्षांच्या नेत्यांच्या मनात काय आहे, हे महाराष्ट्राच्या मनातलं आहे असे म्हणणे योग्य नाही. हे फार मोठे स्टेटमेंट होईल, असे सूचक विधानही फडणवीस यांनी केले.

पुण्यात रेव्ह पार्टीवर पोलिसांनी छापा टाकला. या रेव्ह पार्टीवरील कारवाईत एकनाथ खडसेंचे जावई प्रांजल खेवलकर यांना अटक करण्यात आली आहे. यावर बोलताना ते म्हणाले, मी पण ही माहिती माध्यमातून घेतली आहे, कारण मी सकाळपासून विविध कार्यक्रमांमध्ये फिरतो आहे. त्यामुळे मला ब्रीफिंग घेता आलेलं नाही. मात्र, जे माध्यमात दिसलं त्याप्रमाणे पुणे पोलिसांनी एका रेव्ह पार्टीवर कारवाई केली आहे. त्यामध्ये काही लोक सापडले आहे. त्यामध्ये काही ड्रग्स वगैरे सापडले आहेत. पोलीस अधिकाऱ्यांकडून पूर्ण ब्रीफिंग घेतल्यानंतर यावर बोलू शकेल. मात्र प्राथमिकदृष्ट्या असा प्रकारचा गुन्हा त्या ठिकाणी घडल्याचा दिसून येत आहे. दरम्यान मंत्री संजय शिरसाट आणि राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यात बैठकांच्या मुद्यावरुन झालेल्या पत्रव्यवहाराबाबत देखील मुख्यमंत्र्यांनी प्रतिक्रिया दिली. असं पत्र लिहून कोणीही वाद निर्माण करु नये. मंत्र्यांनी आपापसात बोलावं आणि मंत्र्यांना काही अडचणी असतील तर त्यांनी मला येऊन सांगावं, त्यातील अडचण दूर करता येईल. मंत्री आणि राज्यमंत्री दोघेही शासनाचे भाग आहेत, सर्व अधिकार मंत्र्यांकडे असतात. मंत्री जे अधिकार देतात ते राज्यमंत्र्यांचे अधिकार असतात, यात कुठलाही संशय नाही. मात्र राज्यमंत्र्यांना बैठका घेण्याचा अधिकार नाही असे मानणे हे चुकीचे आहे. राज्यमंत्र्यांना बैठका घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. पण अशा प्रकारच्या बैठकांमध्ये काही धोरणात्मक निर्णय होत असतील, तर ते मंत्र्यांशी बोलल्याशिवाय घेऊ नये किंवा घेतले तर मंत्र्यांची मान्यता घेतली पाहिजे. मंत्री आणि राज्यमंत्री यांनी सामंजस्य दाखवले पाहिजे. काही अडचण असेल तर माझ्याशी बोलले पाहिजे, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# संकटाला घाबरू नका, भगवंताचे चिंतन करा- ह.भ.प.पुरूषोत्तम महाराज

## भेंडाळा मारूती मंदीरात किर्तन सोहळा उत्साह संपन्न



**खुलताबाद**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद प्रतिनिधी खुलताबाद तालुक्यातील खांडी पिंपळगाव येथील भेंडाळा मारुती मंदिराच्या परिसरात कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते या प्रसंगी ह.भ.प. पुरूषोत्तम महाराज पाटील यांनी माणसाच्या जीवनात संकटे येत असतात संकट किती मोठे असू द्या घाबरू नका भगवंताचे चिंतन करा त्यामुळे संकटे आपो आप चालली जात असल्याचे ह.भ.प. पुरूषोत्तम महाराज पाटील यांनी शनिवारी दि २६ रोजी तालुक्यातील जागृत दक्षिणमुखी भेंडाळा मारूती मंदीरातील किर्तन सोहळ्यात सांगितले. जागृत दक्षिणमुखी भेंडाळा मारूती मंदीरात श्रावणातील दर शनिवारी नामवंत प्रसिद्ध किर्तनकारांचा किर्तना सोहळा प्रविण इंगळे,सुजाता इंगळे यांच्या वतीने खांडी पिंपळगाव येथील भेंडाळा मारुती मंदिराच्या परिसरात आयोजित करण्यात आले होते. श्रावण महिन्याच्या पहिल्याच शनिवारी हभप पुरूषोत्तम महाराज पाटील यांच्या कीर्तनाच्या कार्यक्रमाला महाराजांचे प्रवचन व दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी भरपावसात भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

भाविकांना प्रबोधन करतांना हभप पुरूषोत्तम महाराज पाटील म्हणाले कृपा देवीची कशी होईल यासाठी प्रयत्न करा, एकदा देवाने कृपा केली तर लोकतर करणारच आहे.श्रावण महिना आहे पावसाने ही जोरदार साथ दिली या पवित्र महिन्यात देवाचे नामस्मरण करण्याचे आवाहन केले तसे तर बारा महिने ढाब्यावर असतात एक महिना देवाचे नाव घ्या हनुमंतराया सर्व संकटे दूर करेल. प्रारंभी हभप पुरूषोत्तम महाराज पाटील यांचा सत्कार प्रविण इंगळे ,सुजाता इंगळे दाम्पत्याने केला. त्यानंतर महाप्रसाद वाटप करण्यात आले.

# धनंजय मुंडे यांना क्लीनचिट मिळाल्याने माणिकराव कोकाटेंचे मंत्रीपद धोक्यात! अजित पवार काय म्हणाले?

**अहिल्यानगर:** वादग्रस्त कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचे रमी प्रकरण राजकारणात चांगलेच तापले आहे. विरोधक त्यावरून कोकाटे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करत असताना, इथे धनंजय मुंडे यांना सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातून क्लीनचीट मिळाल्यामुळे त्यांचा मंत्रीमंडळात पुन्हा समावेश होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे कोकाटे यांना बाहेरचा रस्ता दाखवून त्यांच्या जागी धनंजय मुंडे यांना घेतले जाणार का? अशी विचारणा केली जात आहे. मात्र याबद्दल कोण निर्णय घेणार? यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अहिल्यानगरमध्ये प्रतिक्रिया दिली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार हे अहिल्यानगर जिल्हा दौऱ्यावर आहेत. राहुरी येथे अरुण तरपुरे यांनी आयोजित केलेल्या कार्यकर्ते म ेळाव्यानंतर अहिल्यानगर शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्ण कृती पुतळ्याच्या अनावरणासाठी आणि क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले पुतळा उभारणीच्या भूमिपूजन कार्यक्रमासाठी अजित पवार आले होते. यादरम्यान त्यांनी पत्रकारांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांना उत्तरे दिली. ज्यात धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाच्या निर्णयाबाबत आपले स्पष्ट मत सांगितले

धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाच्या निर्णयाबाबत अजित पवार यांचे स्पष्ट मत

धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाच्या निर्णयाबाबत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सूचक विधान करत निर्णयाचा चेंडू मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कोर्टात टोलावला. तसेच वादग्रस्त कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या वरील कारवायाच्या निर्णयाबाबतही मुख्यमंत्री फडणवीसच निर्णय घेतील, असे सांगून कोकाटेंवर कारवाई होणार की, अभय मिळणार याची उत्सुकता देखील उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वाढवली.

धनंजय मुंडे यांना क्लीन चिट मिळाली आहे. त्यामुळे त्यांचा भाजप महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात पुन्हा समावेश होण्याच्या चर्चांचा जोर आहे. त्यावर अजित पवार म्हणाले, ‘याबाबतचा निर्णय मुख्यमंत्री घेतात. मी याबाबत एवढेच बोललो आहे की, त्यांच्या संदर्भात न्यायालयीन व राज्य सरकार मार्फत चौकशी जी सुरू होती, त्याचा अहवाल प्राप्त झालेला आहे. मंत्रिमंडळात कोण असावे, याबाबतचा निर्णय मुख्यमंत्री व महायुतीच्या माध्यमातून आम्ही सगळे एकत्र बसून घेऊ‘.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199